# मा. उप मुख्यमंत्री (वित्त) श्री. अजित पवार यांनी सोमवार, दिनांक ८ मार्च २०२१ रोजी केलेल्या अर्थसंकल्पीय भाषणाची ठळक वैशिष्ट्ये

## भाग–दोन

(अ) **मुद्रांक शुल्कामध्ये सवलत :—**

महिलांच्या लाभात होणाऱ्या घराचे अभिहस्तांतरण किंवा विक्री करारपत्राचे दस्त नोंदणी केल्यास मुद्रांक शुल्कामध्ये प्रचलित दरातून १ टक्का सवलत देण्याचे प्रस्तावित आहे.

(ब) **राज्य उत्पादन शुल्काच्या दरात वृद्धी :—**

देशी ब्रँडेड मद्यावरील उत्पादन शुल्काचा दर, निर्मिती मुल्याच्या २२० टक्के किंवा रुपये १८७ प्रती प्रुफ लिटर यापैकी जे अधिक असेल ते, असा बदल प्रस्तावित आहे.

(क) **मद्यावरील मूल्यवर्धित कराच्या दरात वृद्धी :—**

मद्यावर मूल्यवर्धित कर कायद्याच्या अनुसूची ‘ख’ नुसार सध्या अस्तित्वात असलेल्या मूल्यवर्धित कराचा दर ६० टक्के वरुन ६५ टक्के करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, मूल्यवर्धित कर कायद्यातील कलम ४१ (५) नुसार मद्यावर सध्या अस्तित्वात असलेल्या मूल्यवर्धित कराचा दर ३५ टक्के वरुन ४० टक्के करण्याचे प्रस्तावित आहे.

*****